# पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन मधील परदेशी व भारतीय धावपटूंच्या कामगीरीचा आढावा

**हर्षल सुभाष निकम**
संशोधक, आगाशे महाविद्यालय, पुणे

## सारांश

*आजच्या आधुनिक ऑलिंपिक स्पर्धेत मॅरेथॉन ह्या एक सर्वात दिमाखदार, डौलदार व मानवाच्या शारीरिक कसोटी तपासण्याच्या क्रीडा प्रकारात या स्पर्धेचा समावेश होतो. या स्पर्धेत खेळाडूला इतर स्पर्धेबरोबरच धावण्याच्या अंतराबरोबर स्पर्धा करावी लागते.*

***महत्वाच्या सज्ञा :*** बास्केटबाक्षतता, पुनर्प्राप्ती

## इतिहास :

खिस्तपूर्व ४९० साली मॅरेथॉनच्या लढाईत पार्शियन सैन्यावर अॅथेनियन लष्कराने विजय मिळवला. तेंव्हा ही विजयी वार्ता जाहीरपणे सांगण्यासाठी एकटा ग्रीक सैनिक फिलिपाईडस मॅरेथॉनहुन अॅथन्सपर्यंत धावत येऊन ''आपण जिंकलो आनंदोत्सव साजरा करा'' असे सांगून तो जमिनीवर कोसळला आणि त्यातच त्याचा शेवट झाला. फिलिपाईडसची ही कामगीरी आणि घटना इतिहासात फार ठळकपणे नोंदविली गेली नाहीच. पण मानवाच्या क्षमतेची परिसीमा गाठणारी ही कामगीरी म्हणून त्याची नोंद घेतली गेली. आधुनिक ऑलिंपिक स्पर्धेत मात्र १८९६ साली अथेन्समध्ये प्रथमच मॅरेथॉन स्पर्धा झाली व त्याने ऑलिंपिकची सांगता झाली.

## भारतातील पहिली मॅरेथॉन पुण्यातच :

२२ ऑगस्ट १९२० अँटवर्प ऑलिम्पिक स्पर्धा यातील मॅरेथॉन ही भारताच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची होती. कारण प्रथमच भारतीय धावपटू या शर्यतीत सहभागी झाला होता. पुण्याचे फडाप्पा चौगुले यांनी

या शर्यतीत २ तास ५० मीनिटे ४५ सेकंद वेळ नोंदवून १९ वा क्रमांक पटकावला होता. मूळ बेळगावचे रहिवाशी असलेल्या चौगुले यांनी १९१९ मध्ये पुण्यात डेक्कन जिमखाना येथे झालेल्या चाचणी स्पर्धेत २ तास ४८ मीनिटे ४९ सेकंद वेळ नोंदविली होती. या कामगिरीची नोंद आशियाई विक्रम म्हणून झाली होती. भारतातील पहिली मॅरेथॉन शर्यत १९१९ मध्ये पुण्यातच आयोजित केली गेली होती. हे यावरून सिद्ध होते. त्यानंतर पुण्यात डेक्कन जिमखान्याने राष्ट्रीय स्तरावर मॅरेथॉन शर्यतीचे आयोजन केले गेले.

आशियाई खंडात जपानने संयोजनात आणि पदके मिळविण्यात आघाडी घेतली होती. भारतात मात्र पुण्यातच अशी शर्यत होत होती. तीच परंपरा पुढे खंडीत झाली आणि १९८३ मध्ये त्याचे पुनरूज्जीवन झाले ते आणखी भव्य स्वरूपात म्हणजेच पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनच्या स्वरूपात !

## पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन :

श्री. शरद पवार, श्री. सुरेश कलमाडी, श्री. रमेश तावडे, श्री. प्रल्हाद चव्हाण, श्री. बॅप्टीस डिसूजार या सर्वांच्या प्रयत्नातून २५ सप्टेंबर १९८३ रोजी पहिल्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचे आयोजन पुण्यात झाले. त्यात तीन हजार धावपटूंचा सहभाग होता. आज ३२ वर्षांच्या काळात २९ वेळा होणारी कोणतीही आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन भारतात फक्त पुण्यातच होत आहे.

## गरज व महत्त्व :

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन मधील परदेशी व भारतीय धावपटूंच्या कामगिरीचा आढावा पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ही एक वार्षिक मॅरेथॉन असून ही भारतात महाराष्ट्र राज्यात पुणे येथे दरवर्षी होते या स्पर्धेची सुरूवात १९८३ साली करण्यात आली. २०१० साली या स्पर्धेला २५ वर्षे पुर्ण झाली व भारतातील सर्वात जूनी म्हणून ही मॅरेथॉन ओळखली जाते. त्याचबरोबर २०१४ या वर्षी स्पर्धेला २९ वर्षे पुर्ण झाले आहेत. सन १९८३ साली पुणे येथे सुरू झालेल्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनला आज जगभरात होत असणाऱ्या नामांकीत मॅरेथॉन मध्ये स्थान आहे. या मॅरेथॉनमुळे पुण्यातील वातावरण क्रीडामय होण्यासाठी भरीव असे योगदान आहे. पुण्याला जगाच्या नकाशावर नेणारी पुणे आंतरराष्ट्रीय स्पर्धा असेही तीचे वेगळे वैशिष्टय आहे. या स्पर्धेचे संयोजन हे भारतातील अनेक मॅरेथॉन स्पर्धांना दिशादर्शक ठरले आहे. १९८३ ते २०१४ या काळात बयाच वेळा अनेक परदेशी व भारतीय धावपटूंनी या स्पर्धेमध्ये विजेतेपद पटकावली आहेत, या सर्व गोष्टींमुळे पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचा अभ्यास करणे गरजेचे आणि महत्त्वाचे वाटते हे लक्षात येईल.

## संशोधनाचा हेतू :

- १९८३ ते २०१४ पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमधील परदेशी व भारतीय धावपटूंच्या कामगीरीचा आढावा घेणे.
- पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमधील परदेशी खेळाडूंच्या कार्यमानाचा आढावा घेणे.
- पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमधील भारतीय खेळाडूंच्या कार्यमानाचा आढावा घेणे.
- पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त वेळा जिंकलेल्या खेळाडूंच्या कामगीरीचा आढावा घेणे.
- पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडूंच्या जिंकलेल्या कामगीरीचा आढावा घेणे.

## संदर्भ साहित्या आढावा :

- आकाश मोरे (२००६). हनुमान व्यायाम प्रसारक मंडळसंस्था अभ्यास, अप्रकाशित लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.
- किशोर पठारे (२००९) डेक्कन जिमखाना क्लबचे क्रीडाविषयक योगदान, एम. फिल पदवी अप्रकाशित पुणे विद्यापिठ, पुणे
- पाटील, मं. (२००३). स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या जीवन कार्याचा सखोल अभ्यास करून त्यांचे कुस्ती क्षेत्राला कोणते योगदान मिळाले याचा मूल्यामापनात्मक अभ्यास, अप्रकाशित एम.फिल. लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

वरील सर्व संशोधकांनी संशोधनासाठी व्यष्टी अभ्यास पध्दतीचा उपयोग केला आहे. संशोधन समस्ये संबंधी माहिती प्राप्त करण्यासाठी उपलब्ध दस्ताऐवज, प्रश्नावली, मुलाखत या सर्व संशेधन साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. यामुळे संस्था व व्यक्ती यांनी दिलेले ीडा योगदान आपल्याला समजण्यास सोपे होते.


## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधनातील व्यष्ठी अभ्यास पद्धतीचा उपयोग करणार आहे.

**साधने :** प्रस्तुत संशोधनामध्ये उपलब्ध दस्ताऐवजाचा वापर केला गेला आहे.


**विश्लेषण :** सन १९८३ ते २०१४ या काळामध्ये एकूण २९ वेळा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकूण २३ वेळा परदेशी धावपटू व ६ वेळा भारतीय धावपटूंनी विजेतेपद मिळविले आहे. या सर्व

बाबींचा अंदाज आपल्याला खालील आलेखावरून समजून येतो.





१९८३ ते २०१४ या काळात २३ वेळा परदेशी धावपटूंनी या स्पर्धेचे विजेतेपद मिळवून या स्पर्धेवर एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. या स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळवितानाच त्यांनी प्रत्येकवेळी चांगल्या वेळेत स्पर्धा पुर्ण करण्याचासुद्धा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या वेळेत व भारतीय धावपटूंच्या वेळेमध्ये मोठी तफावत आढळून येते. यासाठी आपल्याला खालील आलेखाद्वारे स्पर्धेच्या धावपटूंचे कामगिरीचे कार्यमान दिसून येते.

**परदेशी खेळाडू कामगिरी**



सन १९८३ ते २०१४ या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनच्या २९ वर्षाच्या इतिहासात या स्पर्धेच्या सुरूवातीच्या काळात भारतीय धावपटूंना या स्पर्धेच्या विजेतेपदास गवसणी घातली आहे. या गोष्टीचा अंदाज आपल्याला खालील आलेखावरून समजून येतो.

## भारतीय खेळाडू कामगिरी




**निष्कर्ष :** वरील सर्व विश्लेषणावरून खालील निष्कर्ष काढता येऊ शकतात.

- परदेशी धावपटू हे भारतीय धावपटूंपेक्षा कामगिरीमध्ये सरस आहेत.
- भारतीय धावपटू व परदेशी धावपटूंच्या ६ सर्वोत्तम वेळांचा विचार केला असता त्यामध्ये १० मीनिटांचा फरक आढळतो.
- परदेशी धावपटू १९९६, २००३, २००९, २०१०, २०११, २०१२ या अलिकडच्या वर्षात सर्वोत्तम वेळ नोंदविताना दिसतात.
- भारतीय धावपटू १९८५, १९८६, १९८९, १९९०, १९९२, १९९७ या स्पर्धेच्या सुरूवातीच्या काळात विजेते झालेले आहेत.
- सन १९९७ ते २०१४ या काळात परदेशी धावपटूंनी या स्पर्धेवर वर्चस्व राखलेले आहे.
- भारतीय धावपटूंमधील विजेते हे प्रामुख्याने सेनादलाचे खेळाडू आहेत.
- परदेशी धावपटूंमध्ये आफ्रिकन खेळाडूंनी या स्पर्धेवर आपले वर्चस्व १७ वेळा सिद्ध केलेले आहे व ५ वेळा युरोपियन खेळाडूंनी आणि १ वेळा आशियाई खेळाडून ही स्पर्धा जिंकलेली आहे.

**शिफारसी :**

- भारतीय धावपटू जे मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होतात त्यांच्या प्रशिक्षणाचे शास्त्रोक्त पद्धतीने आयोजन करणे गरजेचे आहे.

- पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमधील माजी भारतीय विजेते आहेत त्यांचे मार्गदर्शन व अनुभव हे नवोदित खेळाडूंना देणे गरजेचे आहे.
- भारतीय धावपटूंना आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी करून घेणे गरजेचे आहे.
- भारतीय धावपटूंच्या प्रशिक्षकांना मॅरेथॉन प्रशिक्षणाबाबत अधिक शास्त्रोक्त माहिती देणे गरजेचे आहे.
- भारतीय धावपटू व प्रशिक्षकांसाठी विविध कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन या सारखे कार्यक्रम आखणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची :

*मिलिंद ढमढेरे (२०००) बदलता प्रवास ऑलिंपिकचा पुणेः पद्मगंधा प्रकाशन पृ.क्र. १२*

Chris Oxlade & David Ballhherimenr (1999) 'Olympic Games' Publisher dorling Kindersley Page - 15

*प्रल्हाद सावंत (२००४) ऑलिंपिक अथेन्स पृ.क्र. ३७–४०, पुणेः नॅशनल स्पोर्टस् ट्रस्ट प्रकाशन*

*हेमंत जोगदेव (२००४) ऑलिंपिकमधील अॅथलेटिक्स, पृ.क्र. ६५५–६५७. पुणे: दिलीप राज प्रकाशन*

*आकाश मोरे (२००६). हनुमान व्यायाम प्रसारक मंडळसंस्था अभ्यास, अप्रकाशित लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.*

*किशोर पठारे (२००९) डेक्कन जिमखाना क्लबचे क्रीडाविषयक योगदान, एम. फिल पदवी अप्रकाशित पुणे विद्यापिठ, पुणे*

*पाटील, मं. (२००३). स्वर्गीय खाशाबा जाधव यांच्या जीवन कार्याचा सखोल अभ्यास करून त्यांचे कुस्ती क्षेत्राला कोणते योगदान मिळाले याचा मूल्यामापनात्मक अभ्यास, अप्रकाशित एम.फिल. लघुशोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.*